# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

**(ISO 9001:2008 प्रमाणित)**

पत्र पेटी क्र. - ५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

website : http://www.dteau.org email : roaurangabad@dtemaharashtra.gov.in


website : http://www.dteau.org email : roaurangabad@dtemaharashtra.gov.in


जा.क्र.:तंशिविकाऔ/ITCell/MahaDBT/२०१९/ 833

दिनांक: 1 MAR 2019

प्रति,

प्राचार्य,

या विभागांतर्गत येणा-या सर्व संस्था

विषय : डी.बी.टी. पोर्टलवर दि.१३-०३-२०१९ पर्यंत विद्यार्थ्यांच्या अर्जांची छाननी करून मान्यता घेण्यास्तव

संदर्भ : मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे पत्र क्र. १८/तशिसं/ईबीसी/डीबीटी/२०१९/१०४, दि. ०२-०३-२०१९

तंत्रशिक्षण संचालानालयांतर्गत राबविण्यात येणा-या शिष्यवृत्ती योजनांकरिता MahaDBT पोर्टलवर विद्यार्थ्यांच्या अर्जांची तपासणी करण्याकरिता देण्यात आलेल्या अंतिम मुदतीबाबत मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांचे परिपत्रक आपल्या माहिती व कार्यावाहीस्तव सोबत जोडलेले आहे.

MahaDBT पोर्टलवर आपल्या संस्थेच्या विद्यार्थ्यांचे वैध अर्ज सर्व कागदपत्रांसह तपासणी करून पुढे मंजुरीस्तव पाठविण्याकरिता तसेच वैध नसलेले अर्ज नामंजूर करण्याकरिता आपणास दि.१३-०३-२०१९ रोजी पर्यंत अंतिम मुदत देण्यात येत आहे. तसेच अंतिम मुदतीनंतर कोणत्याही स्तरावर प्रलंबित राहिलेले अर्ज स्वीकारले जाणार नाहीत व असे अर्ज आपोआपच सिस्टीम मधून रद्द होतील. अर्ज मुदतीत सादर करू न शकल्यामुळे व ते desk२ कडून मंजूर न झाल्यास या बाबतची सर्वस्वी जबाबदारी संस्थाप्रमुखाची राहील याबाबत आपणास सूचित करण्यात येत आहे व आपल्या संस्थेतील विद्यार्थी सदरील शिष्यवृत्तीपासून वंचित राहू नयेत याची काळजी घ्यावी.

(महेश शिवणकर)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
औरंगाबाद

प्रत : मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर

F/c


# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २२६१७९६९

E-mail : desk१८@dtemaharashtra.gov.in Internet : www.dtemaharashtra.gov.in


**ई-मेल/ रजिस्टर एडी/ स्पीड पोस्टद्वारे**

क्रमांक : १८/तशिसं/ईबीसी/डीबीटी/२०१९/ २०४

दिनांक : ०२ /०३/२०१९

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.

**विषय : डी.बी.टी. पोर्टलवर विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी व अर्जांची तपासणी करण्याकरीता देण्यात आलेल्या अंतिम मुदतीबाबत.**

**संदर्भ :** १) या संचालनालयाचे पत्र क्र.: १८/तशिसं/ईबीसी/डीबीटी/२०१९/८७, दि. २० /०२/२०१९

२) दि. २८.०२.२०१९ रोजी पार पडलेल्या बैठकीचे इतिवृत्त.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, संदर्भ क्र. २ अन्वये दि. २८.०२.२०१९ रोजीच्या माहिती व तंत्रज्ञान संचालनाल, मंत्रालय यांनी आयोजित केलेल्या बैठकीतील निर्णयानुसार व त्या अनुषंगाने प्राप्त बैठकीच्या इतिवृत्तानुसार राज्यातील विविध विभागांना शिष्यवृत्ती योजनांसाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरण्याची व विभागांनी सदर अर्जाची तपासणी (मंजूर/नामंजूर) करण्याची अंतिम मुदत निश्चित करण्यात आलेली असून, तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती योजनांकरीता **विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी अंतिम दि. ०१.०३.२०१९** व **अर्जांची तपासणी (मंजूर/नामंजूर) करण्यासाठी अंतिम दि. १५.०३.२०१९** अशी निश्चित केलेली आहे.

याबाबत आपणास कळविण्यात येते की, विद्यार्थ्यांना ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी अंतिम तारीख ०१.०३.२०१९ अशी असून प्राप्त अर्जांची तपासणी (मंजूर/ नामंजूर) करण्याची अंतिम तारीख १५.०३.२०१९ ही निश्चित केल्याने आपण आपल्या अखत्यारितील संस्थांना दि. ११.०३.२०१९ पर्यंत अर्जांची तपासणी करुन घेण्याबाबत कळवावे व विभागीय कार्यालय स्तरावरील अर्जांची तपासणी दि. १३.०३.२०१९ पर्यंत करुन घ्यावी. प्राप्त अर्जांच्या तपासणीच्या अंतिम दिनांकानंतर कोणत्याही स्तरावर पेंडिंग राहिलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत व असे अर्ज अंतिम दिनांकानंतर आपोआपच सिस्टिममधून रद्द होतील.

पात्र विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये या कारणास्तव संस्था स्तरावर, विभागीय स्तरावर तपासणीसाठी प्रलंबित असलेले अर्ज अंतिम दिनांकापूर्वी निकाली (मंजूर/ नामंजूर) काढावेत. तसेच विद्यार्थ्यांचे Sent Back करण्यात आलेले अर्ज अगर विद्यार्थी / क्लार्क / प्राचार्य / विभागीय कार्यालय यांच्या लॉगीनमध्ये त्यावरील पुढील कार्यवाहीसाठी प्रलंबित असतील तर अशा अर्जाबाबतची प्रलंबित कार्यवाहीसुध्दा अंतिम दिनांकापूर्वी पूर्ण करून निकाली काढावेत. प्रलंबित अर्जाबाबतची कार्यवाही विहित मुदतीत पूर्ण न केल्यास रदद झालेल्या अर्जांची सर्वस्वी जबाबदारी संस्था प्रमुखाची राहिल. त्याबाबतच्या सूचना संबंधित संस्थांना द्याव्यात तसेच संस्थांनी त्या त्या संस्थांमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांनाही सूचित करण्याबाबत कळवावे.

(डॉ. अभय वाघ)

संचालक

तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई.